दैनिक हेराल्ड

# गोव्याच्या मीठागरांतील जैवसंपदेवर मिशेल फर्नांडिस यांना पीएचडी

पणजी, दि. १३ (प्रतिनिधी) :

गोवा विद्यापीठची विद्यार्थिनी असलेल्या मिशेल फर्नांडिस यांना जैवतंत्रज्ञान विषयात नुकतीच पीएचडी प्रदान करण्यात आली आहे. डॉ. फर्नांडिस यांना विद्यापीठाच्या बायोटॅक्नोलॉजी विभागाच्या प्राध्यापक डॉ. सविता केरकर तसेच डॉ. नंदकुमार कामत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

डॉ. फर्नांडिस यांनी बटन अळंबी अधिक काळ टिकविणारे रसायन शोधून काढले आहे. डॉ. फर्नांडिस सध्या गोमेकॉच्या एचआयव्ही विभागात सक्रीय आहेत. डॉ. फर्नांडिस यांनी सलग सात वर्षे डॉ. केरकर या प्रमुख व डॉ. कामत यांच्या सह मार्गदर्शनाखाली संशोधन केले. डॉ. फर्नांडिस यांनी गोव्यातील मीठागरांच्या पाण्यात उद्योगक्षेत्राला उपयुक्त असे सुक्ष्मजीवांचा शोध लावला असून त्यातून तयार होणाऱ्या रसायनाचा वापर अळंबी दीर्घकाळ टिकविण्यासाठी होणार आहे. या संशोधनकार्यात त्यांना अळंबी पैदास क्षेत्रातील दिग्गज संगम कुराडे यांचेही मौलिक सहकार्य मिळाले आहे




पणजी : डॉ. मिशेल फर्नांडिस यांना पीएचडी प्रदान करताना डॉ. सविता केरकर व डॉ. नंदकुमार कामत.

Dainik Herald Edition
14 Dec, 2019 Page No. 2